**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांची साक्ष</u>**

**<u>शपथेवर सरतपासणी वादीपक्षातर्फे – श्री. जे.एम. महामुनी विद्यमान वकील यांच्यामार्फत</u>**

शपथेवर सत्य कथन करते की, माझे संपूर्ण नाव चंद्रकांत रंभाजी मोटे, वय– ६३ वर्षे, धंदा–काही नाही, राहणार – अंबरनाथ, ता. अंबरनाथ, जि.ठाणे, मुंबई असुन माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकुर मी सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेकामी मी त्यावर माझी सही आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १८ तर्फे टी.आर. कुलकर्णी माडगुळकर यांच्यामार्फत सुरु –</u>**

**०१.** मी माझा दुरुस्त दावा आणि जादा पुराव्याचे शपथपत्र संपूर्ण वाचून पाहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ५ व ६ मध्ये नमुद केलेला मजकूर माझ्या दुरुस्त दाव्यामध्ये नमुद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, परिच्छेद क्र. ८ मधील दुसरी ओळ ते शेवटपर्यंत नमुद केलेला मजकूर माझ्या दुरुस्त दाव्यामध्ये नमुद केलेला नाही. सदर मजकूर माझ्या दुरुस्ती दाव्यामध्ये का नमुद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतात की, माझ्या वकीलांना माहिती आहे, ते सांगू शकतील.

**०२.** वादग्रस्त मिळकती माझे वाडवडीलार्जीत म्हणजे कृषणाकडून विठोबाकडे, विठोबाकडून रंभाकडे आणि रंभाकडून माझ्या नावे आल्या असे दाखविणारा फेरफार उतारा मी प्रस्तुत प्रकरणा दाखल केलेला आहे. साक्षीदार सांगतात की, फक्त विठोबाच्या नावावर असलेल्या मिळकतीचा उतारा दाखल

केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णाकडून विठोबा, विठोबाकडून रंभाकडे आणि रंभाकडून माझ्या नावे वादग्रस्त मिळकती आल्या असे दाखविणारा फेरफार या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णाकडून विठोबाकडे मिळकत आली असे दाखविणारा कागद प्रस्तुत प्रकरणात दाखल केलला नाही.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १, २ व १८ यांच्यामध्ये झालेली तडजोड मी कोणत्याही न्यायालयात अगर महसुल दप्तरी आव्हानीत केली नाही. महसुल किंवा न्यायालयामध्ये तक्रार केलला कागद या प्रकरणात दाखल केलेला आहे. साक्षीदार संचिका पाहून सांगातात की, तो कागद दाखल केलेला नाही. प्रतिवादी क्र. १, २ व १८ मध्ये झालेली तडजोड बेकायदेशीर आहे म्हणून ती रद्दबातल करण्याची मागणी या दाव्यामध्ये केलेली नाही.

**प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक –१३.०१.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
आटपाडी.